अर्थ विभाग ,जिल्हा परिषद ठाणे
कार्यालयाचा पत्ता : तहसिलदार कार्यालयासमोर, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) 400601
दुरध्वनी क्रमांक ०२२-२५३३३७३३, २५३६१५३४ E-mail gadzpthane@gmail.com

**प्रथम प्राधान्याने**
**विकल्पाने समायोजन**

जा.क्र.ठाजिप/अर्थ /आस्था-१/ 280 /१६
दिनांक :- 02/08/२०१६

**प्रति,**

खाते प्रमुख(सर्व)-----------------------------------------------
जिल्हा परिषद ठाणे/पालघर
गट विकास अधिकारी ,
पंचायत समिती,(सर्व) जि.ठाणे/पालघर

विषय : ठाणे/पालघर जिल्हयात जि.प.कर्मचारी समायोजनासाठी विकल्पाच्या यादया प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ : १. ग्रामविकास विभागा कडील शासन निर्णय क्र.एपिटि-५०१६ / प्र.क्र.४५/ आस्था-८, दि.२२.०७.२०१६
२. सामान्य प्रशासन विभागाचे पत्रक्र.ठाजिप/साप्रवि/आस्था-३अ/६३०/१६, दि.२६.०७.२०१६.
३. सामान्य प्रशासन विभागाचे पत्रक्र पत्र क्र.ठाजिप/साप्रवि/आस्था-३अ/६३४/१६ दि.२८.७.१६
४.मा.विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्र क्र.विकास/कार्या-२/सेभ/ प्र.क्र४९३६/२०१६/११२०, दि.२०.८.२०१६.

उपरोक्त संदर्भान्वये कळविणेत येते की,संदर्भ १ अन्वये दि.२२ जुलै,२०१६ च्या शासन निर्णयानुसार ठाणे व पालघर जिल्हयातील जिल्हा परिषद कर्मचा-यांचे समायोजन प्रस्तावित आहे. त्या बाबत संदर्भीय शासन निर्णयातील निकष व विकल्पानुसार यादया तयार करुन या कार्यालयास सादर करणे बाबत कळविणेत आले होते. संदर्भ ३ अन्वये उक्त शासन निर्णयातील निकषानुसार प्राधान्यक्रमा बाबत संबंधित कर्मचा-यांकडून आवश्यक ते पुराव्यासहीत माहिती या कार्यालयास दि.३०/७/२०१६ पर्यंत सादर करणे बाबत स्थानिक व दैनिक वत्तपत्रातुन प्रेसनोट व्दारे आव्हान करण्यात आले होते.

त्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहितीचे संकलन करुन सेवाजेष्ठतेनुसार व प्राधान्य क्रमाप्रमाणे मंजुर आकृतीबंधानुसार पदनिश्चिती करणे बाबत संदर्भ ४अन्वये दि.२२/८/२०१६ रोजी समन्वय समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.विभागीय आयुक्त,कोकण विभाग यांनी दिलेल्या निर्देशानुसार समायोजन प्रक्रिया संबंधिची कर्मचा-यांनी दिलेल्या विकल्पानुसार व शासन निकषातील प्राधान्य क्रमा बाबत समायोजनाच्या यादया विभागीय/तालुका स्तरावर प्रसिध्द करुन सर्व कर्मचारी संघटनांच्या माध्यमातून सर्व कर्मचा-यांपर्यंत पोहचवावी. यादी प्रसिध्द करताना कोणताही कर्मचारी वंचीत राहणार नाही व या बाबत कोणत्याही प्रकारची तक्रार येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

सवर्गनिहाय समायोजन विकल्पाच्यायादया खालील प्रमाणे सोबत जोडल्या आहेत.

| अ.क्र. | संवर्गाचे नांव | यादितील पृष्ठ क्र. १ ते ५९ पर्यंत |
|---|---|---|
| १. | सहाय्यक लेखा अधिकारी . | १ ते १७ |
| २. | कनिष्ठ लेखाधिकारी | १९ ते २७ |
| ३ | वरिष्ठ सहा.(लेखा) | २९ ते ३९ |
| ६ | कनिष्ठ सहाय्यक. (लेखा) | ४१ ते ५९ |

वरिल प्रमाणे विकल्प यादीतील माहितीत विसंगती अथवा प्राधान्यक्रमा बाबत हरकत असल्यास सात दिवसात कर्मचा-यांकडून प्राप्त करुन घेणेत यावीत. व त्यानुसार समायोजनाची अंतिम यादी तयार करुन पदनिश्चितीनुसार समायोजनाची कार्यवाही पुर्ण करणेत येईल. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्यात यावा.

किशोरराजे निंबाळकर
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद,ठाणे.**

प्रत :-मा.विभागीय आयुक्त,कोकण विभाग,कोकण भवन नवी मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
प्रत.-मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी .
/- पालघर जिल्हयातील कर्मचा-यांसाठी सदर विकल्पाच्या यादया प्रसिध्द करणे बाबत सर्व खाते प्रमुखांना आपल्यास्तरावरुन सुचित करणेत यावे.